सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४

# मिळकतीच्या व्यवस्था (मुंबई प्रांतापुरत्या) कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम, १९४७

(दिनांक ३१ डिसेंबर २००५ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. LIV OF 1947**

# The Dispositions of Property (Bombay) Validation Act, 1947

*(As modified upto 31st December 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर यांच्याद्वारे भारतात
मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२००६.

(किंमत रुपये १.००)

[ सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४ ][1]

# मिळकतीच्या व्यवस्था (मुंबई प्रांतापुरत्या) कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम, १९४७

[ १६ जानेवारी, १९४८ ]

**विवक्षित मिळकतीच्या व्यवस्था मुंबई प्रांतापुरत्या कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** विवक्षित मिळकतीच्या व्यवस्था मुंबई प्रांतापुरत्या कायदेशीर ठरविणे इष्ट आहे;

**त्याअर्थी** याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** या अधिनियमास, मिळकतीच्या व्यवस्था (मुंबई प्रांतापुरत्या) कायदेशीर ठरविण्याबाबत अधिनियम, १९४७, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

**२.** दिनांक १ जानेवारी १९४५ पूर्वी, करण्यात आलेल्या सर्व विश्वस्त व्यवस्थांना आणि मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या सर्व इच्छापत्रांना आणि त्याच्या इतर मृत्यूपत्रीय व्यवस्थेला पुढील बाबीमध्ये हा अधिनियम लागू होईल. अधिनियम लागू करणे.

(क) जेव्हा अशी विश्वस्तव्यवस्था, इच्छापत्रे किंवा स्थावर मिळकतीची मृत्यूपत्रीय व्यवस्था ही, मुंबई प्रांतामध्ये स्थित असलेल्या मिळकतीशी संबंधित असेल तर,

१९२५ चा ३९. (ख) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याच्या भाग दोन मध्ये या विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई प्रांतातील अशी विश्वस्तव्यवस्था, मृत्यूपत्रे किंवा मृत्यूपत्रीय व्यवस्था ही, स्थावर मिळकती व्यतिरिक्त अन्य प्रत्येक वर्णनाच्या मिळकतीशी संबंधित असेल आणि एखाद्या न्यासकर्त्याने, किंवा यथास्थिती, मृत्यूपत्रकर्त्याने तयार केली असेल, त्यावर कार्यवाही केली असेल किंवा ती जाहीर केली असेल तर,

१८८२ चा ४. १९२५ चा ३९. **३.** कायद्याच्या पुढील तरतुदी या कलम २ मध्ये, म्हणजे (क) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याच्या कलम १३ मध्ये, आणि (ख) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याच्या कलम ११३ मध्ये नमूद केलेल्या संलेखाद्वारे अंतर्भूत असलेल्या किंवा त्याद्वारे तयार केलेल्या मिळकतीच्या व्यवस्थेला, लागू होणार नाहीत आणि कधीच लागू झाल्या नव्हत्या, असे मान्ले जाईल. विवक्षित व्यवस्था कायदेशीर दाखविणे.

(२) कलम २ मध्ये नमूद केलेल्या संलेखामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याद्वारे तयार केलेल्या मिळकतीच्या व्यवस्थेला या अधिनियमाच्या अनुसूचीच्या पहिल्या स्तंभामध्ये नमूद केलेल्या अधिनियमिती लागू होतील आणि त्या अधिनियमिती अनुसूचीच्या दुस-या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वगळण्यासह किंवा फेरफारासह नेहमीच लागू होत्या असे मानले जाईल.

**४.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी मूल्यवान प्रतिफलासाठी कोणत्याही व्यक्तीने संपादित केलेल्या किंवा सक्षम न्यायालयाच्या अंतिम हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशान्वये कोणत्याही व्यक्तीला उपार्जित झालेल्या कोणत्याही अधिकाराला, मालकी हक्काला किंवा हितसंबंधांना कोणत्याही प्रकारे परिणाम होत असल्याचे किंवा त्याला बाधक ठरत असल्याचे मानले जाणार नाही. व्यावृत्ती.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९४७ भाग-पाच, पृ. क्र. ३८६ (इंग्रजी) पहा.

## अनुसूची

| (१) अधिनियमिती | (२) वगळणे आणि फेरफार |
|---|---|
| संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ चे कलम १५. | "कलम १३ आणि" याऐवजी संपत्ती हस्तांतरण "कलम" हा मजकूर दाखल करणे. |
| संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ चे कलम १६. | "कलम १३ आणि" याऐवजी "कलम" हा मजकूर दाखल करणे. |
| हिंदु व्यक्तीच्या मिळकतीची व्यवस्था अधिनियम, १९१६ याच्या कलम ३ चा खंड (ख). | "११३" हा मजकूर वगळणे. |
| भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याचे कलम ११५. | "कलम ११३, किंवा" वगळणे. |
| भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याचे कलम ११६. | "कलम ११३, आणि" या ऐवजी "कलम" हा मजकूर दाखल करणे. |
| भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ ची अनुसूची तीन. | "११३" वगळणे. |
| भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ याच्या अनुसूची तीनमधील "पूर्वगामी कलमे लागू करण्यामधील निर्बंध आणि फेरफार" या शीर्षाखालील खंड (५). | "एकशे तेरा" हा मजकूर वगळणे. |

शासकीय मुद्रणालय, नागपूर.